# मानवाधिकार :एक विश्लेषण

डॉ. व्ही. एस. इंगळे राज्यशास्त्र विभाग प्रमुख गो. सी. गावंडे महाविद्यालय उमरखे जि. यवतमाळ **मो. नं. ९४२२७१५५४९**

..................................................................................................................

**मानव जन्मतः स्वतंत्र आहे, परंतु त्याच्या पायात समाजाने बेड्या अडकविल्या -रूसो वैचारिक परिवर्तनाशिवाय सामाजिक परिवर्तन अशक्य - मानवेंद्रनाथ रॉय** मानवी सभ्यतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारे दोन महायुध्द झाले. दोन्ही पक्षाचे मिळून पाच कोटी लोकांना प्राण गमवावे लागले. अपरिमित आर्थिक हानी झाली. आणि मानवी सभ्यता, संस्कृती आणि अस्तित्व याबाबत जागतिक पटलावर विचार मंथनाला प्रारंभ झाला. १० जानेवारी १९२०ला राष्ट्रसंघाची निर्मिती व २४ ऑक्टोबर १९४५ ला संयुक्त राष्ट्रसंघ अस्तित्वात आला. मानवाधिकाराच्या दृष्टिने या दोन संस्था मैलाचे दगड ठरतात. एकविसावे शतक मानवाधिकाराचे शतक मानले जाते. मानवाधिकाराच्या जागृतीमूळे भारतासहित सर्व देशभर मानवी अधिकाराचे भविष्य उज्वल मानले जाते. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास मानवाधिकाराच्या संरक्षणावर अवलंबून आहे. व्यक्तिविकासाशिवाय सामाजिक विकास आणि सामाजिक विकासाशिवाय राष्ट्रविकास शक्य नाही म्हणुन मानवी हक्कांना संरक्षण देणे प्रत्येक राज्याचे मूलभूत कर्तव्य बनते. किंबहूना त्याकरिताच राज्य ही संस्था अस्तित्वात आली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली ओळख किंवा दर्जा निश्चित करण्यासाठी मानवाधिकाराचा मापदंड म्हणून वापर होताना दिसतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकमत संवेदनशिल बनवून त्यांना आंतरराष्ट्रीय स्वरुप प्राप्त करून देण्यात युनोचे मोलाचे योगदान आहे. मानवी हक्क हे कोणत्याही राज्य अथवा संविधानाने दिलेली देणगी नाही. मानवी अधिकार हा निसर्गदत्त अधिकार होय.

**व्याख्या रॅन्डम हाऊस विश्वकोश** श्मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्माने जगण्यासाठी अत्यावश्यक आहे.

**रिचर्ड बसर स्ट्रॅाम** 'व्यक्तीला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक क्षमतांचा विकास करण्यासाठी आवश्यक अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.'

**डी. डी. बसु** 'प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही भेदभावा शिवाय आणि जन्मतःराज्यविरुध्द प्राप्त झालेले अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.'

**मॉरिस कॅटसन** 'मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च पवित्र अधिकार असुन त्याचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.'

**न्यायमुर्ती नागेंद्रसिंग** 'प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला रंग, लिंग, वंश आदी भेदभावा शिवाय केवळ मनुष्य म्हणून मिळालेले अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.' लोकशाही मुल्यांना आधारभूत मानून संपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन घडवुन आणणारी विचारधारा म्हणजे मानवाधिकार होय.

**मॅकफरलेन** 'मानवी अधिकार हे असे नैतिक अधिकार आहेत की जे प्रत्येक स्त्री आणि पुरुषाला केवळ माणूस या नात्याने प्राप्त झाले आहेत.'

**उद्देश** अनियंत्रित राज्यसत्तेला लगाम लावणे गुलामगिरी नष्ट करणे. शोषणमुक्त समाज निर्माण करणे. गुन्हेगार नसलेल्या निष्पाप नागरिकावर होणारे अन्याय, अत्याचार थांबविणे. नैसर्गिक अधिकराचे संरक्षण करणे. व्यक्तिगत विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करुण देण्यास राज्याला भाग पाडणे सन्मानाने जिवन जगण्यासाठी संपुर्ण मानवाला अन्न, वस्त्र व निवारा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणे.

**मानवी हक्काचा उगम** मानवाधिकाराच्या उद्यासंबंधी वेगवेगळे मत मतांतरे आहेत. 'पाश्चिमात्य दस्तऐवजातून मानवाधिकाराचा जन्म झाला.' हे भाष्य सर्वाना मान्य होणार नाही. मानवतेला काळीमा फासवणा-या रुढी, प्रथा व परंपरा पाश्चात्य देशातही मोठ्या प्रमाणावर होत्या. स्त्रीयांना स्वातंत्र्य न देणे, दासप्रथा, गुलामांचा बाजार भरविणे, वंशभेद इ. सतीप्रथा, केशवपन, विधवा विवाहाला बंदी, वेठबिगारी अशा प्रथा पूर्वेकडील राष्ट्रात होत्या. म्हणून मानवाधिकाराचा उद्य पाश्चात्य देशातच झाला असे समजणे गैर आहे. बौध्द व जैन धर्माचा उद्य माणसानी माणसाशी माणुसकीने वागावे या नैसर्गिक इच्छेतून झाला. १२१५ चा मॅग्नाकार्टा, १६२७ बिल ऑफ राईटस्, १६८९ चा पिटीशन ऑफ राईटस्, १७८९ चा फ्रेंच राज्यक्रांतीचा जाहिरनामा, १० डिसेंबर १९४८ चा यूनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्युमन राईटस्, १६ डिसेंबर १९६६ चा इनटरनॅशनल कॉन्हेंट ऑफ सिव्हिल अॅन्ड पॉलिटिकल राईटस्, इंटरनॅशनल कॉनव्हेंट ऑफ इकॉनॉमिक, सोशल अॅन्ड कल्चरल राईटस्, यांना मानवी अधिकाराची जन्मदात्री मानले जाते

**मानवी अधिकाराची वास्तविक स्थिती** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढता अत्याचार मानावाधिकारासमोर यक्षप्रश्न निर्माण करीत आहे. दहशतवाद, बॉम्ब हल्ले, जातीय दंगली, लैंगिक अत्याचार, अस्पृश्यांचे शोषण कौटुबिंक हिंसा, कुपोषन, बालकामगार, वेश्या व्यवसाय अशा सारख्या अनेक समस्यावर उपाय शोधणे लेखक, अभ्यासक, संशोधक, विचारक, समाज व राज्यकर्त्यांची जबाबदारी आहे. प्रस्तूत शोध निबंधामध्ये मानवाधिकार उल्लंघनाच्या अनेक घटना भयावह आकडेवारी सहीत देण्याचा प्रयत्न अभ्यासकाने केला आहे. भारतासहीत संपूर्ण जगात मानवी हक्काची होणारी धुळधाण पाहता मानवी मन हेलावून जाते. भारतातील १९८४ चे ब्लू स्टार ऑपरेशन, १९८५-८६ चे शाहाबानो प्रकरण, १९९२ बाबरी मज्जिद उध्वस्त, २००२ची गुजरात दंगल, मालेगाव बॉम्बस्फोट, रेल्वेतील साखळी बॉम्ब स्फोट, भारतीय संसदेवरील हल्ला, दिल्लीच्या उच्च न्यायालयातील

आवारातील बॉम्ब स्फोट, मुंबई वरील दहशतवादी हल्ला, जम्मू काश्मीर खो-यातील हिंसाचाराचे थैमान, रामदेव बाबांच्या आंदोलनावरील पोलीसांचा हल्ला मानवतेचा बळी घेत आहेत.

**महिलावरील अन्याय** १००० नेपाळी महिला दरवर्षी भारतात व्यावसायिक लैंगिक अत्याचाराला बळी पडातात. २५ ते ३० हजार बांग्लादेशी स्त्रीया व मुलींचा व्यापार केला जातो. बिहार व ओरीसात ४० हजारापेक्षा जास्त महिला आर्थिक व लैंगिक शोषनाला बळी पडतात. लिंग परिक्षणची सोय उपलब्ध झाल्यापासूनच्या प्रारंभिक काळात १९८४ मध्ये ४० हजार भृणहत्या भारतात झाल्यात. २००२ च्या मानव विकास निर्देशांकाच्या अहवालानुसार २७ टक्के महिलांना मुलीपेक्षा मुलगाच हवा तर ८४ टक्के महिलांना एकतरी मुलगा असावा अशी अपेक्षा असते. सरकारी आाकडेवारी नुसार **२००२** मध्ये विनयभंग ३३९४३, बलात्कार १६३६३, हुंडाबळी ६८२२, कौटूंबिक हिंसा ४९२३७, **२००३** मध्ये अपहरण १२ टक्के ,छेळछाड, २५ टक्के, लैंगिक शोषण ४.९ टक्के, कौटूंबिक हिंसा ३०.४ टक्के बलात्कार १२.८ टक्के, भृणहत्या ६.८ टक्के, हुंडाबळी ४.६, हुंडाविरोध ०.६ टक्के. **२००४** मध्ये बलात्कार १६०७८, लैंगिक शोषण ३१८३६, हुंडाबळी ६६५५, हुंडाविरोध ४८३४६, **२००६** मध्ये बलात्कार १६१३२, लैंगिक शोषण ३११२०, हुंडाबळी ६३२०, हुंडाविरोध ४७९८१, **२००९** मध्ये अपहरण २५७४१, छेळछाड ३५७११, लैंगिक शोषण ११०९, कौटूंबिक हिंसा ८९५४६ तर मुलींचा व्यापार ४८ आरोग्य मंत्रालयाच्या अहवालासनुसार ५०टक्के मुलींचे विवाह १५ व्या वर्षी होतात. नोंदणी कार्यालयाच्या अहवालानुसार दररोज २४० मुली अल्पवयीन विवाहाने झालेल्या गर्भधारणेच्या अडचणीमुळे मृत्यू पावतात. युनिसेफ च्या संशोधनानुसार भारतात दरवर्षी हुडांप्रश्नी ५००० स्त्रीयांची हत्या होते. अमेरिकेत दर ९ सेकंदाला एका महिलेला पतीकडुन मारहाण होते. जगात पुरुष व स्त्रीयांचे प्रमाण १००:१२५ आहे. तर भारतात हेच प्रमाण १००: ९३ आहे. जगात फक्त ५ देशामध्ये महिला कायदेमंडळात प्रतिनिधित्व करते. फक्त ३६ देशामध्ये महिलांना प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झाली. ब्रांझिल सारख्या देशात कौटिंबिक हिंसा व बलात्काराच्या गुन्ह्यांसाठी शिक्षेचे प्रावधान नाही. महिण्याकाठी बाग्लादेशातुन पाकिस्तानमध्ये १०० ते २०० स्त्रीयांना वेश्या व्यवसायाकरिता प्रवृत्त केल्या जाते. परिणामी बालवेश्यालये निर्माण करावे लागत आहे. आंध्रपदेशात ५, आसामात २, बिहार ८,गोवा १, केरळ २, मध्यप्रदेश १०, महाराष्ट्र ९, ओरिसा ५, राजस्थान ९, आणि तामिळनाडू मध्ये ५ वेश्यालये आहेत. दिल्लीच्या जी.बी. रोडवर ८६ वेश्यालये आहेत. सर्वेक्षणानुसार बलात्कारीत मुलींना वेश्या बनण्यास प्रवत्त केले त्यामध्ये १६ वर्षा दर्मानच्या जास्त मुलींचा समावेश आहे. जगात साधारणतः १६ टक्के स्त्रीयांना आयुष्यात केव्हा तरी बलात्कारास तोंड दयावे लागते. मध्यप्रदेशात १९९६ मध्ये महिलांच्या सदंर्भात १९६७७९ गुन्हे नोंदविले, १९९७ मध्ये २०५२०६ तर १९९८ मध्ये २०१२७९ गुन्हयांची नोंद झाली. जिथे स्त्रीला 'यत्र नार्यस्तु पुजंत्ये रमते तंत्र देवता' असे मानल्या जायचे तेथे स्त्री म्हणजे अनंत कोटी पापाची राशी अशी अवस्था झाली आहे. नारीचा सन्मान करून वैभव प्राप्त करून देण्याचे आव्हान आज मानवाधिकारा समोर उभे आहे.

**अल्पवयीन बालकासमोरील आव्हान** यशस्वी जीवनाचे धडे गिरविण्यासाठी पाठशाळांचे दारे ठोठावण्यास पुढे सरसावणा-या बालकांना आपले बालपण हरविण्याची वेळ आली आहे. समस्याग्रस्त कौटूंबिक परिस्थितीमुळे कुपोषण, उपासमार, अवजड ठिकाणी काम करणे अशा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. 'मनुष्यबळ विकास अहवालाच्या महितीनुसार' मेळघाटमध्ये वर्षाकाठी ५०० हून अधिक बालमृत्यू कुपोषणामुळे होतात. मानव संसाधन मंत्रालयाच्या अहवालानुसार अकार्यक्षम बालकांचा शालेय उपस्थितीचा दर ५३ टक्के, वाचा दोष ५७ टक्के, श्रवण दोष असलेल्या बालकांचा ६८ टक्के प्रमाण आहे. दारिद्रय बेकारी, अशिक्षितपणा, परंपरागत व्यवसाय या कारणामुळे वेगवेगळ्या व्यवसायात प्रौढासोबत अनेक मुले बालमजुरीस बळी पडतात. शेतीमध्ये १६३९७४१८, लघुउधोग २६०१५६६, मोठेउधोग ३२०००३५, विधुतगॅस, पाणी पुरवठा २१८६६, बांधकाम, विटा उचलणे१४०३०७९, दुकानामध्ये २३३२७९३, हॅटेल रेस्टॅरन्ट ३०५०४९, गोदाम,माल साठवणे १२८३६, आर्थिक व्यवहारात मध्यस्थी ८८९३१५ अशा आकडेवारीमुळे बालकांच्या सुरक्षितेवर प्रश्न लागले. परिणामी क्षयरोग, अशक्तपणा, चर्मरोग, जायटा, व खरूज अशा भयंकर आजाराला बळी पडतात. जगात १५० कोटी लोक आजही दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात. २००३ ला उपासमारीवर प्रशिध्द झालेल्या अहवालानुसार जगात ८कोटी ४२लाख जनता उपासमारीचा सामना करतात.

**पोलीसांचा अतिरेक व कारागृहातील गैरवर्तन** देश व जनतेच्या सुरक्षिततेची शपथ घेणारे कायद्याचे रक्षक व जनतेचे सेवक मानवाअधिकारांचे भक्षक बनत चालले आहेत. कर्तव्यात कसुर होत असल्याने देशासमोर सुरक्षतेचा प्रश्न भेडसावत आहे. बॉम्बस्फोटासारखे हल्ले नियमित झाले आहेत. सुरक्षिततेच्या नावाखाली आपली दडपशाही चालवित आहेत. १९८४च्या दरम्यान पंजाब मध्ये ५० हजार नागरीकांना अंत्यसंस्कार न करता दफन केले. एशीयन सेंटर फॉर ह्युमन रॅाइटस्च्या अंदाजानुसार भारतात दररोज चार व्यक्ती पोलीस कोठडीत मरण पावतात. ५० टक्के पोलीस अधिकारी कैद्यावर शारीरिक, मानसिक अत्याचार करतात. १९९३ मध्ये नागरिक व सिमा सुरक्षा दलामध्ये संघर्षात तिघांचा मृत्यू झाला. त्याचा बदला म्हणून जवानांनी (**B.S.F.**) ६० नागरीकांची क्रुर हत्या केली. २००६ मध्ये औरंगाबादला पोलिसांनी भर चौकात एका इसमाला ठार केले. दवाखण्यात घाटीमध्ये ;सरकारी हॉस्पीटल द्ध दाखल करून भिंतीवरून पडल्याचा खोटा अहवाल देण्याची विनंती डॉक्टरांना केली. १९९४-९५ या काळात ११७ लोक पोलीस कोठडीत मरण पावले. ४९७ लोक पोलीसांच्या अतिरेकामुळे १३५ लोकांना गुन्हेगार नसतांना बेकायदेशिरीत्या अटक केल्यामुळे मरण पावले. लाईट फुट **Human Right U.S. State** मध्ये म्हणतात की, अमेरिकेमध्ये हजारो काळ्या लोकांना होळीप्रमाणे जिवंत जाळले जाते. अशा लोकांना जिवंत राहण्याचा अधिकार मृत्यु पत्रासारखा आहे.

**दलीतावरील अत्याचार रु.** आधुनिक काळात तंत्रज्ञान व विज्ञानाचा गवगवा होत असला तरी वर्णव्यवस्थेचा पगडा जनतेला पुरोगामीतत्वाकडे नेण्यास अडथळा बनला आहे. उच्च वर्गीयाकडुन दलितावर होणारे अत्याचार आणखीनही कमी होण्यास तयार नाही. १९९९-२००४ मध्ये दलितांच्या अत्याचारासंबधी १३२६७२ इतके गुन्हे दाखल झाले. ११६१३ गुन्हे न्यायालयात विचाराधीन

आहेत. ३.७५: गुन्हयांचा निवाडा झाला आहे. भारतात आदिवासी व अनु. जमाती पैकी ८०: आदिवासी दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात. दर आठवडयाला १३ दलितांची हत्या केली जाते. दर दिवशी ११ दलितांना मारझोड केली जाते. प्रत्येक मिनिटाला दलिताविरोधी गुन्हा नोंदविला जातो. १४० प्रकारांनी अस्पृश्यता घडते. गुन्हेगारीची आकडेवारी पुढील प्रमाणे :-

| अ.क्र. | गुन्हा | अनु. | जाती | विरूद | गुन्हे | अनु. | जमाी | विरूद | गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००५ | २००६ | २००७ | २००८ |
| १ | हत्या | ६६९ | ६७३ | ६७४ | ६२६ | ६२६ | १९५ | १४० | १२८ |
| २ | बलात्कार | ११७२ | १२१७ | १३४९ | १४५७ | ६४० | ६९९ | ६२७ | ५८५ |
| ३ | अपहरण | २५८ | २८० | ३३२ | ४८२ | ७२ | ८८ | ८९ | ९३ |
| ४ | दरोडे | २६ | ३० | २३ | ५१ | २७ | १२ | ०९ | १४ |
| ५ | चोरी/लुट | ८० | ९० | ९६ | ८५ | ४९ | २९ | २१ | १८ |
| ६ | जाळपोळ | २१० | २२६ | २३८ | २२५ | ३८ | ४६ | ५४ | ४९ |
| ७ | मारहाण | ३८४७ | ३७६० | ३८१४ | ४२१६ | ७६७ | ८३८ | ८५५ | ८७३ |
| ८ | नागरी संरक्षण अधिनियम | २९१ | ४०५ | २०६ | २४८ | १६२ | ४९ | ० | ०६ |
| ९ | अ.जाती/अजमाती | ८४९७ | ८५८१ | ९८१९ | ११६०२ | १२८३ | १२३२ | ११०४ | १०२२ |
| १० | इतर | ११०७७ | ११८०८ | १३४९० | १४६२३ | २५११ | २६०३ | २६२८ | २७९४ |
| | एकूण | २६१२७ | २७०२७ | ३००३१ | ३३६१५ | ५७१३ | ५७९१ | ५५३२ | ५५८२ |

**National Coime Record Burea of Indí २००८ च्या आकडेवारीनुसार**

**सारांश** :-मानवी हक्कांच्या संरक्षणाचा विचार करतांना नक्षली, माओवादी आंदोलनांनी आपली मर्यादा ओलांडल्याने जम्मू काश्मिर, आसाम, मिझोराम, नागालॅंड मध्ये हिंसक वळण घेऊन निरपराध लोकांचे बळी जात आहेत. सत्य उलगडण्यासाठी पुलिसकडून अमानवीय व्यवहार होतो आहे. **Incounter** सारख्या घटनांचे प्रमाण वाढत आहे. टाडा, पोटा सारखे कायदे मानवी हक्कातील अडथळे समजत आहेत. परंतु त्यामुळे समाजाच्या संरक्षणासाठी प्राणपणाने लढणा-या सुरक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह लावण्या ऐवजी त्यामधील कथीत कुप्रवृत्या नष्ट करून सुरक्षा यंत्रणा व त्यांना माहिती देणा-या गुप्तचर यंत्रणांमागे पुरेसे पाठबळ उभे केल्याशिवाय सामान्य माणसाचा जीव सुरक्षित ठेवण्यासाठी ते पुढाकार घेणार नाहीत. मानवी मुल्यांच्या या अभयारण्यात ;समाजामध्येद्ध व्यक्तिमत्वाच्या प्रतिष्ठेसाठी केवळ राज्यावर अवलंबून राहण्याऐवजी मानवी अधिकारचे हनन होण्याचा प्रसंग ओढवू नये. म्हणून सामाजिक पातळीवर देखील मानवी हक्कांचा आदर करण्याशिवाय पर्याय नाही. कैद्याला योग्य वागवणूक देणे, निपक्षपाती खटला चालविणे, पोषक आहार पूरविणे, स्त्री कामगांराना मातृत्व काळात योग्य सवलती, महिलांना कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण पुरविणे हया बाबीचा समावेश सुध्दा मानवी हक्कामध्ये येतो. मानवाधिकाराच्या संकल्पनेला वाचवण्यासाठी केलेल्या प्रयत्ना मध्ये डॉ. पेन चुन चॉंग, फ्रेंस मॅनरीना केसीन, न्युट्रान ब्रेझसनस्की यांचा महत्वपूर्ण उल्लेख केला जातो. युनोच्या चार्टर क्र.१ व २ अनुच्छेद ३ ते २१, व २८ ते ३० मधील यथोचित व सद्यस्थितीनरूप अर्थ घेऊन राबर्ट मर्टन व डब्ल्यु जी. रुसिमन यांचा सापेक्ष वंचीततेचा सिध्दांत उल्लेखनीय आहे. राजकीय हेतूने प्रेरित होऊन लावलेली आणिबाणी त्यामुळे झालेली मानवाधिकाराची अवहेलना न्यायालयाची गळचेपी, अभ्यासकाच्या आत्मपरिक्षणास सहाय्यभूत ठरली. व त्यातुन मानवी हक्काला बळ मिळाले. गडचिरोली जिल्हयातील लेखामेंढा येथील देवाजी तोफांच्या नेतृत्वाखालील आमच्या गावातील आम्हीच सरकार ही चळवळ मानवी हक्काला बळ देणारी आहे. मानवी गरजा, आजार, बेकारी, अज्ञान व गलिच्छता यांचा समूळ नाश केल्याशिवाय व्यक्तीची प्रतिष्ठा निर्माण होणार नाही असे विल्यम ब्रेव्हरीम म्हणतात.

**संदर्भ**:-


१. डॉ. पुरणमल, दलित संघर्ष आणि सामाजिक न्याय, अविष्कार प्रकाशन, नागपूर.

२. साने गिता, भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन, मुंबई.

३. कौशिक आशा, नारी सशक्तीकरण, पोइन्टर पब्लिशर्स, व्यास बिल्डिंग एमएमएस हाइवे जयपूर.

४ डॉ. देवळाणकर शैलेंद्र, भारतीय पराराष्ट्र धोरण, सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४. नरके हरी, श्रीमंत भारतात ८४ कोटी गरीब, दैनिक देशोन्नती, १६ ऑक्टोबर २०१०.

५. जोशी विजय, कायदे स्त्रिया व मुलांचे, मुकुंद प्रकाशन, ठाणे.

6- http:/www.ietre.org/content/w0103